महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट जी-९, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
Email : ciro@mahadiscom.in website : www.mahadiscom.in दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
सी. आय. एा. नं. U४०१०९MH२००५SGC१५३६४५९

जा.क्र. औसंवि/ब/वार्षिक क्रीडास्पर्धा/२०२५-२६/**२४३०६** दिनांक : **२९/०७/२०२५**

# परिपत्रक

**विषय :** महावितरण कंपनी अंतर्गत **सन २०२५-२६ च्या** राज्यस्तरीय वार्षिक क्रीडास्पर्धा आयोजनाबाबत.

*********

मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक (महावितरण) यांनी संचालक (वित्त) व संचालक (मानव संसाधन) यांचेशी विचारविनिमय करुन महावितरण कंपनी अंतर्गत **प्रतिवर्षी माहे जुलै च्या दुसऱ्या सप्ताहामध्ये राज्यस्तरीय आंतर प्रादेशिक विभाग नाट्यस्पर्धा तसेच माहे नोव्हेंबर च्या पहिल्या सप्ताहामध्ये राज्यस्तरीय आंतर परिमंडलीय वार्षिक क्रीडास्पर्धा आयोजनाची मंजूरी दिलेली असून,** त्यानुसार सन २०२५-२६ च्या राज्यस्तरीय वार्षिक क्रीडास्पर्धेच्या कार्यक्रमाची रूपरेषा खालीलप्रमाणे राहील.

## -: वार्षिक क्रीडास्पर्धा :-

महावितरण कंपनी अंतर्गत राज्यस्तरीय आंतर परिमंडलीय वार्षिक क्रीडास्पर्धेचे आयोजन सुटसुटीतपणे व सुनियंत्रीत होण्याच्या दृष्टीने कंपनीतील १६ परिमंडळे तसेच सांघिक कार्यालय परिमंडळ असे एकूण १७ परिमंडळांना भौगोलिक परिक्षेत्रानुसार खालीलप्रमाणे **एकूण ०८ परिमंडळात** विभागणी करण्यात आले आहे.

| अ.क्र. | परिमंडळाचे नांव |
|---|---|
| १ | छत्रपती संभाजीनगर परिमंडळ (नांदेड व लातूर परिमंडळासह) |
| २ | नाशिक परिमंडळ (जळगांव परिमंडळासह) |
| ३ | कल्याण परिमंडळ (रत्नागिरी परिमंडळासह) |
| ४ | सांघिक कार्यालय (भांडूप परिमंडळासह) |
| ५ | नागपूर परिमंडळ (चंद्रपूर व गोदिंया परिमंडळासह) |
| ६ | अकोला परिमंडळ (अमरावती परिमंडळासह) |
| ७ | पुणे परिमंडळ (बारामती परिमंडळासह) |
| ८ | कोल्हापूर परिमंडळ |

### १. परिमंडल स्तरावर निवड चाचणी :

राज्यस्तरीय आंतर परिमंडलीय क्रीडास्पर्धेकरिता परिमंडळ स्तरावर **माहे सप्टेंबर / ऑक्टोबर - २०२५** मध्ये निवड चाचण्या आयोजित करण्यात याव्या. भौगोलिक परिक्षेत्रानुसार विभागणी करण्यात आलेल्या परिमंडलांतर्गत प्रत्येक मंडल खालील नमूद केलेल्या निकषांनुसार खेळ / क्रीडा प्रकारनिहाय आंतरगृह स्पर्धेसाठी ०३ ते ०४ तसेच बाह्यगृह स्पर्धेसाठी ०५ ते ०६ खेळाडूंची निवड करुन अशा खेळाडू कर्मचाऱ्यांच्या नावांची यादी सोबत जोडलेल्या 'परिशिष्ट - अ' मधील आवेदनपत्रासह दि. ३०/०९/२०२५ पर्यंत निवड चाचण्या आयोजित करणाऱ्या संबंधित परिमंडळाकडे

सादर करावी. जे खेळाडू / कर्मचारी विहित मुदतीत नियंत्रण अधिकाऱ्यांमार्फत 'परिशिष्ट - अ' आवेदनपत्र संबंधित कार्यालयात सादर करतील तेच खेळाडू / कर्मचारी निवड चाचणी व आंतर परिमंडलीय क्रीडा स्पर्धेत सहभागी होण्यास पात्र राहतील. **निवड चाचणीचा कार्यक्रम ०१ दिवसाचा राहील तसेच, सदर निवड चाचण्या सुट्टीच्या दिवशी आयोजित करण्यात याव्या.**

**मंडल स्तरावर खेळाडूंची निवड करण्याचे निकष खालीलप्रमाणे राहील.**

- कर्मचारी खेळाडूंचे सध्याचे वय, वजन, शारीरिक पात्रता, खेळाचे कौशल्य इत्यादीचा विचार करुन संबंधित खेळ / क्रीडा प्रकारात निवड करावी.
- सन २०२४-२५ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या वार्षिक आंतर परिमंडलीय / आखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या संबंधित खेळ / क्रीडा प्रकारांच्या क्रीडास्पर्धेत सहभाग / प्राविण्य संपादन करणाऱ्या खेळाडूंना प्राधान्य देण्यात यावे.
- नवीन भरती झालेले कर्मचारी ज्यांनी संबंधित खेळ / क्रीडा प्रकारांमध्ये शालेय / जिल्हा / राज्य / राष्ट्रीय पातळीवरील क्रीडास्पर्धेत सहभाग / प्राविण्य संपादन केले असल्यास त्यांचा प्राधान्याने विचार करण्यात यावा.

## २. राज्यस्तरीय आंतर परिमंडलीय वार्षिक क्रीडास्पर्धा :

राज्यस्तरीय आंतर परिमंडलीय वार्षिक क्रीडास्पर्धा **नागपूर प्रादेशिक विभागांतर्गत अमरावती परिमंडळाच्या वतीने माहे नोव्हेंबर -२०२५ च्या पहिल्या सप्ताहामध्ये** आयोजित करण्यात याव्या. तत्पुर्वी सर्व संबंधित परिमंडळांनी परिमंडळ स्तरावर निवड चाचण्या आयोजित करुन निवड केलेल्या खेळाडूंची यादी संबंधित यजमान परिमंडळाकडे दि. ३१/१०/२०२५ पर्यंत पोहचेल अशी पाठवावी. **सदर स्पर्धेचा कालावधी ०४ दिवसांचा राहील (फक्त क्रिकेटच्या स्पर्धा आवश्यकतेनुसार क्रीडास्पर्धा कालावधीच्या ०१ दिवस आधीपासून आयोजित करण्यात याव्या.)**

**राज्यस्तरीय आंतर परिमंडलीय क्रीडास्पर्धेत खालील क्रीडा प्रकारांचा समावेश राहील.**

| अ.क्र | खेळ / क्रीडा प्रकार | पुरुष खेळांडूची संख्या | महिला खेळांडूची संख्या |
|---|---|---|---|
| १ | कबड्डी | १० | १० |
| २ | खो-खो | १० | १० |
| ३ | व्हॉलीबॉल | १० | - |
| ४ | क्रिकेट | १३ | - |
| ५ | बॅडमिंटन (एकेरी, दुहेरी व सांघिक) | ५ | ४ |
| ६ | टेबलटेनिस (एकेरी, दुहेरी व सांघिक) | ५ | ४ |
| ७ | बुध्दीबळ | १ | १ |
| ८ | कॅरम (एकेरी, दुहेरी व सांघिक) | ५ | ४ |
| ९ | टेनिकॉईट (एकेरी, दुहेरी व सांघिक) | - | ४ |
| १० | ब्रीज (Pair & Team of ४ Duplicate) | ६ | - |
| ११ | कुस्ती (वजनगट) ५७, ६१, ६५, ७०, ७४, ७९, ८६, ९२, ९७, १२५ किलो | १० | - |
| १२ | बॉडी बिल्डींग (वजनगट) ६५, ७०, ७५, ८०, ९०, १०० किलो | ६ | - |
| १३ | पॉवर लिफ्टींग (वजनगट) ५९, ६६, ७४, ८३, ९३, १०५ किलो | ६ | - |

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | १०० मीटर धावणे | १ | १ |
| १५ | २०० मीटर धावणे | १ | १ |
| १६ | ४०० मीटर धावणे | १ | १ |
| १७ | ८०० मीटर धावणे | १ | १ |
| १८ | १५०० मीटर धावणे | १ | १ |
| १९ | ५००० मीटर धावणे | १ | - |
| २० | ४ X १०० मी. रिले (पुरुष व महिला) | उपलब्ध असलेल्या धावकांमधून रिलेकरीता संघ तयार करण्यात यावा. | |
| २१ | उंच उडी | १ | १ |
| २२ | लांब उडी | १ | १ |
| २३ | गोळा फेक | १ | १ |
| २४ | थाळी फेक | १ | १ |
| २५ | भाला फेक | १ | १ |

टिप :- वरीलप्रमाणे नमूद केलेल्या पुरुष व महिलांच्या सांघिक क्रीडा प्रकारात तसेच कुस्ती, बॉडी बिल्डींग, पॉवर लिफ्टींग व मैदानी स्पर्धेत (पुरुष व महिला) विजेतेपद संपादन केलेल्या गुणांचा सर्वसाधारण विजेतेपदाकरीता विचार करण्यात यावा. फक्त बुद्धीबळ खेळातील प्राविण्याचा सर्वसाधारण विजेतेपदाकरीता विचार करण्यात येणार नाही.

**वार्षिक क्रीडास्पर्धा आयोजनासाठी आर्थिक तरतूद :**

१. परिमंडळ स्तरावर निवड चाचण्या आयोजित करण्यासाठी खेळांचे बाह्यगृह मैदान / आंतरगृह खेळासाठी सभागृह आरक्षित करणे, खेळांचे साहित्य खरेदी करणे तसेच खेळानुरुप खेळाडूंची निवड करण्यासाठी तज्ञ व्यक्तींची नेमणूक करणे इ. (सदरची तरतूद प्रत्येकी रु. १,५०,०००/- याप्रमाणे वर नमूद केल्याप्रमाणे एकूण ०८ परिमंडळांकरीता आहे.) — **- रु. १,५०,०००/-**

२. राज्यस्तरीय आंतर परिमंडलीय वार्षिक क्रीडास्पर्धा आयोजित करणे. — **- रु. १७,००,०००/-**

३. राज्यस्तरीय आंतर परिमंडलीय वार्षिक क्रीडास्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना क्रीडा गणवेश खरेदी करणे. (सदरची तरतूद प्रत्येकी रु. २,५०,०००/- याप्रमाणे वर नमूद केल्याप्रमाणे एकूण ०८ परिमंडळांकरीता आहे.) — **- रु. २,५०,०००/-**

उपरोक्त तरतूद **आर्थिक वर्ष २०२६-२७** पर्यंत लागु राहील.

सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, सक्षम प्राधिकारी यांनी दिलेल्या निर्देशानुसार **सन २०२५-२६ च्या राज्यस्तरीय आंतर परिमंडलीय वार्षिक क्रीडास्पर्धा हिवाळी अधिवेशन - २०२५ पुर्वी आयोजित कराव्यात. तसेच सन २०२५-२६ च्या राज्यस्तरीय आंतर परिमंडलीय वार्षिक क्रीडास्पर्धेचे आयोजन करतांना वरीलप्रमाणे मंजूर करण्यात आलेल्या आर्थिक तरतूदीच्या अधिन राहून खर्चाचे नियोजन करून या स्पर्धेकरीता अतिरिक्त खर्च होणार नाही याची दक्षता घ्यावी व अशा आशयाचे कोणतेही प्रस्ताव सांघिक कार्यालयास सादर करण्यात येवू नये.**

त्याचप्रमाणे, उपरोक्तपणे राज्यस्तरीय आंतर परिमंडलीय वार्षिक क्रीडास्पस्पर्धेचे यजमानपद महावितरण कंपनीच्या वतीने संबंधित परीमंडळास बहाल करण्यात आल्यामुळे सदरहू स्पर्धेचे आयोजन करतांना स्पर्धेच्या तारखा निश्चित करणे, पाहूणे ठरविणे, निमंत्रण पत्रिका तयार करणे, कार्यक्रमाची रुपरेषा ठरविणे इत्यादी बाबी सांघिक कार्यालयातील मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांचेशी विचारविनिमय करुन मा. संचालक (मानव संसाधन) यांच्या मान्यतेने करण्यात यावे.

सदरचे परिपत्रक महावितरण कंपनीच्या Employee Portal वरील Circular (I.R. Department) येथे उपलब्ध असून त्यांची मुद्रांकित प्रत प्रसारीत करण्यात येणार नाही. तसेच, सदर परिपत्रकास व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

सोबत : परिशिष्ट 'अ'

(संजय रा. ढोके)
**मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी**

**प्रत :**
प्रेषण यादी प्रमाणे महावितरण कंपनीतील कार्यकारी अभियंता व तत्सम स्तरापर्यंत.

# परिशिष्ट ‘अ’ (सन २०२५-२६ करीता)

## भाग - १ आवेदन पत्र

१. कर्मचाऱ्याचे नाव :

२. भ.नि.नि. क्र. :

३. पदनाम :

४. वय :

५. भ्रमणध्वनी क्र. :

६. विभागाचे नाव :

७. मंडलाचे नाव :

८. खेळ / क्रीडा प्रकार : १.

२.

३.

९. सन २०२४-२५ च्या आंतर परिमंडलीय क्रीडास्पर्धेत सहभाग / प्राविण्याचा तपशील :

१०. सन २०२४-२५ च्या आखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या क्रीडास्पर्धेत सहभाग / प्राविण्याचा तपशील. :

११. नवीन भरती झालेल्या कर्मचाऱ्याचा शालेय / जिल्हा / राज्य / राष्ट्रीय पातळीवरील क्रीडास्पर्धेतील सहभाग / प्राविण्याचा तपशील :

## भाग - २ हमी पत्र

सदरहू स्पर्धा कर्मचाऱ्यांच्या अंगी असलेल्या क्रीडा गुणांना वाव मिळण्यासाठी तसेच कर्मचाऱ्यांच्या अंगी नवचैतन्य व स्फुर्ती निर्माण होण्यासाठी आयोजित करण्यात येत असल्यामुळे सदर स्पर्धेत सहभागी होतांना माझ्याकडून कंपनीची मानहानी / शिस्तभंग होणार नाही तसेच, कंपनीच्या सन २०२५-२६ च्या वार्षिक क्रीडास्पर्धेत सहभागी होण्यासाठी मी पुर्णपणे शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त असल्याची हमी देत आहे.

कर्मचाऱ्याची सही

दिनांक:

नियंत्रण अधिकाऱ्याची सही व शिक्का